ब्रह्मीभूत परमपूज्य श्री. नानाजी रेखी स्थापित

श्री अक्कलकोट स्वामी समर्थ मठ, अहमदनगर येथील

# श्रीस्वामी समर्थांचा आरती संग्रह



प्रकाशक : श्री अक्कलकोट स्वामी समर्थ (रेखी) मठ

४१५५. श्री अक्कलकोट स्वामीसमर्थ (रेखी) मठ (पथ). गुजर गल्ली. अहमदनगर ४१४००१

**।। श्रीस्वामीसमर्थ जय जय स्वामीसमर्थ ।।**



# श्रीस्वामी समर्थ

**ब्रह्मीभूत परमपूज्य श्री. नानाजी रेखी स्थापित**
**श्री अक्कलकोट स्वामी समर्थ मठ, अहमदनगर येथील**
**श्रीस्वामी समर्थांचा आरती संग्रह**

**प्रकाशक : श्री अक्कलकोट स्वामी समर्थ (रेखी) मठ**
४१५५. श्री अक्कलकोट स्वामीसमर्थ (रेखी) मठ (पथ). गुजर गल्ली. अहमदनगर ४१४००१
संपर्क : **दयानंद कृ. रेखी** : ९४२०७९७५२६ ✻ **अजित कृ. रेखी** : ९८२२९९९६२८

## ।। धूपारती ।।

जयदेव जयदेव जय स्वामीराया, धूप अर्पितसे भावे तव पाया ।।धृ.।।
सोज्वळ अग्नीरुपा निजतेजोराशी, अहंभाव धूप कृपे जाळीसी ।।
तत्वासे आनंदे माझे मानसी ।। तवप्रपादा मोदे सुख हो सर्वांसी ।।१।।
पूर्णानंद स्वामी तू सच्चिदानंदा, परमात्मा पर तूंचि आनंदकंदा,
पूर्ण करी स्वामीसुताचे छंदा, अंगी-कारूनी धूपा दे ब्रह्मानंदा ।।२।।

## ।। दीपारती ।।

जयदेव जयदेव जय स्वामीसमर्था,
एकारती ओवाळू दीपारती ओवाळू तुजलागी ताता ।।धृ.।।
स्वयंप्रकाशा तुझीच सर्व ही दीप्ती, पूर्णानंद प्राप्त करिता तव भक्ती
देह-त्रयवाती पाजळोनि प्रीती, ओवाळितो प्रेमे स्वामी तुजप्रती ।।१।।
देवा तुज पाहता येवो प्रेमपूर, नाम निरंतर गाऊनी होवो भवपार,
वाटो तव भक्ती मोठी प्रियकर, स्वामीसुताते देई अखंड हा भर ।।२।।

## ।। नैवेद्यारती ।।

जयदेव जयदेव जय श्रीस्वामीसमर्था, पक्वान्नादी सिद्धी जगी तूच कर्ता ।।धृ.।।
षड्रस पक्वान्ने ही अर्पिता तुज माई, कृपा करोनी ती तू मान्य करुनी घेई
तृप्ती सर्व जीवा जेविता तू आई, जीवन सर्वांचे हे असे तव पायी ।।१।।
आनंदे भोजन करावे तातां, यथेच्छ जेवूनि उच्छिष्ट उरता,
तो प्रसाद देई आपल्या सूता, हेचि मागणे ठेऊनी तव चरणी माथा ।।२।।

## ।। निरांजन आरती ।।

जयदेव जयदेव जय निरंजन साई, निरांजन ओवाळू भावे तव पायी ।।धृ.।।
पंच तत्त्वाचे हे केले निरांजन, पंचप्राण वाती बरव्या घालून,
मोह स्नेह तेचि करुनी परिपूर्ण, दीपज्योती ज्ञानतेजें पाजळून ।।१।।
सच्चिदानंद स्वामी तू आनंदमूर्ती, तुझ्या प्रतापाची सर्व ही दीप्ती,
तुझिया चरणी जडो माझी ही भक्ती, स्वामीसुता नसे अन्यत्र प्रीती ।।२।।

## **श्री गणपतीची आरती :** समर्थ रामदास विरचित

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची। नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची। कंठी झळके माळ मुक्ताफळांची ।।०१।।
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रे मन कामनापूर्ती ।।धृ. ।।
रत्नखचित फरा तूज गौरीकुमरा ।। चंदनाची उटी कुंकुम केशरा।
हिरेजडीत मुगुट शोभतो बरा। रुणझुणती नूपुरें चरणी घागरिया ।।०२।।
लंबोदर पितांबर फणिवरबंधना। सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना। संकटी पावावें निर्वाणी रक्षावें, सुरवरवंदना
।।०३।। जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती। दर्शनमात्रे मन कामनापूर्ती ।।

---

## **श्री देवीची आरती :** कवी नरहरी विरचित

दुर्गे दुर्घट भारी तुजवीण संसारी, अनाथ नाथे अंबे करूणा विस्तारी ।।
वारी वारी जन्म मरणातें वारी ।। हारी पडलो आता संकट निवारी ।।धृ. ।।
जय देवी जय देवी जय महिषासुरमर्दिनी ।। सुरवर ईश्वरवरदे तारक संजीवनी ।।१।।
त्रिभुवनी भुवनी पाहता तुज ऐसी नाही ।। चारी श्रमले परंतु न बोलवे कांही ।।
साही विवाद करिता पडिलो प्रवाही ।। ते तू भक्तालागी पावसी लवलाही ।।२।।
प्रसन्न वदने प्रसन्न होसी निजदासां ।। क्लेशापासून सोडवी, तोडी भवपाशा ।।
अंबे तुजवाचून कोण पुरविल आशा ।। नरहरि तल्लीन झाला पदपंकज लेशा ।।३।।

---

## **श्रीस्वामीसमर्थांची 'महा' आरती :** श्रीस्वामीसुत विरचित

जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था।
आरती ओवाळूं चरणी ठेवुनिया माथा ।। जयदेव जयदेव ।।धृ.।।
छेली खेडेग्रामी तू अवतरलासी। जगदुद्धारासाठी राया तू फिरसी ।।
भक्तवत्सल खरा तू एक होसी। म्हणुनि शरण आलो, तुझे चरणांसी ।।
जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ।।१।।
त्रैगुण परब्रह्म तुझा अवतार। त्याची काय वर्णू लीला पामर ।।

शेषादिक शिणले नलगे त्यां पार। तेथे जडमूढ कैसा करूं मी विस्तार।।
जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ।।२।।
देवाधिदेवा तू स्वामीराया। निर्जर मुनिजन ध्याति, भावे तव पाया।।
तुजसी अर्पण केली आपुली ही काया। शरणागता तारी तू स्वामीराया।।
जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ।।३।।
अघटित लीला करुनी जडमूढ उद्धरिले। कीर्ती ऐकुनी कानी चरणी मी लोळे।।
चरणप्रसाद मोठा, मज हे अनुभवले। तुझ्या सुता न लगे, चरणां वेगळे।।
जयदेव जयदेव जय श्रीस्वामी समर्था ।।४।।

---

**श्रीस्वामीसमर्थांची आरती :** श्रीसत्यदेवानंद सरस्वती विरचित

आरती स्वामीराजा, कोटी आदित्य तेजा,
तू गुरु मायबाप, प्रभो अजानुभूजा।।धृ.।।
पूर्ण ब्रह्म नारायण, देव स्वामी समर्थ,
कलियुगी अक्कलकोटी, आले वैकुंठनाथ।।१।।
लीलया उद्धरिले, भोळे-भाबडे जन,
बहुतीव्र साधकासी, केले आपुल्या समान।।२।।
अखंड प्रेम राहो, नामी ध्यानी दयाळा,
सत्यदेव सरस्वती, म्हणे आम्हा सांभाळा।।३।।

---

**श्रीस्वामीसमर्थांची आरती :** श्री. शं.वा.ढाकेफळकर विरचित

जयदेव जयदेव जय स्वामीसमर्था, दत्तगुरुराया, हृदयज्योतीने ओवाळितो उद्धरिसी काया।।धृ.।। कलियुगातून दत्तयुग हे तुवाच निर्मियले, भक्तजनांचे दुःख विमोचन सदैव हो केले, अगम्य लीला वर्णू किती मी, न कळे तव माया।।१।। ब्रह्मा, विष्णू, शंकर तूचि यतीवर अती थोर, सहज बोलता प्रसादवाणी वेदांचे सार, अक्कलकोटी जे जन जाती पावती तत्कार्या।।२।। दीनदयाळा स्वामी कृपाळा, तोडीसी भवबंध, तुजवीण नाही मजला कोणी देण्या आनंद, पूर्णब्रह्म

तू अवतरलासी भूमी ताराया ।।३।। केशरकस्तुरी मिश्रित चंदन तुजसाठी आणिले, रुद्र कुंडले स्फटिकमाला तेजे लखलखले, फुले सुवासिक भक्ती प्रेमे तुजसी पुजाया ।।४।। अजानुबाहु दत्तदिगंबर पूर्ण कृपामूर्ती, कल्पवृक्ष ती वाचासिद्धी वर्णू तव किर्ती, वामनसुत हा चरणी लागे, समर्थ तू सदया ।।५।। जयदेवा जय स्वामीसमर्था, दत्तगुरुराया, हृदयज्योतीने ओवाळितो उद्धरिसी काया ।।

---

## रेखी मठ 'स्वामी' दर्शन आरती : श्री. रामकवी विरचित

प्रेमे करू निरांजन श्रीगुरूस्वामीसमर्थाला, रेखी मठ पादुका सुदर्शन करी कल्याणाला ।।धृ.।। एकाएकी स्तंभातूनी तो प्रकाश झगमगला, दिव्य तेज जणू रवि उदेला खोलीभर भरला, सैली-कटोरा करी उभा तों, बालयोगी दिसला, माई भिक्षा वाढी त्रिवार, ध्वनी कानी आला ।।१।। जमिनीवर तो अधर योगीवर मागी भिक्षेला, सौभाग्य सखू भिक्षा वाढी वंदूनी चरणाला, ध्यानमग्न सती जागी होती, कथिती नानाला, अक्कलकोटी दांपत्याचा दर्शन सुखसोहळा ।।२।। स्वामीकर पाहूनी कुंडली आज्ञा रेखीला, 'हम तो नंगे फकीर, दिया आत्मलिंग तुजला, जनाब नौबद उभार किल्ला जावो नगराला', रामकवी नौबदी नादध्वनी, नादब्रह्मी नटला ।।३।।

---

## श्रीस्वामीसमर्थ महाराजांची (चरित्रवजा) आरती

(श्री.ना. कन्हेरीकर विरचित)

अक्कलकोटी नित्य निरंजनाऽवधूत समर्था, जय जय स्वामी समर्था, नृसिंहमुने, चातकमुखी द्या कृपामेघ तीर्था ।।ध्रु.।। अलक्षवपु विरुपाक्ष दिगंबर, देही विदेही समर्था ।। प्रौढ बालक परस्पर विरुद्ध गुण संगम राही, आरती अमूर्त मूर्त प्रतीक तुम्ही अयोनिज समन्वयी ।। दत्तपंथी अयोनिज समन्वयी, अवयव सुंदर पूर्णचंद्र मुख नेत्री कारुण्यी ।। कौपीनधारी दिव्य बाहुकटी, मेखलाभूषित समर्था ।।
तेजस्वी जगपालक मधुवच फलानुमेय सुचित,
दत्तनगर मूळ पुरुष वटतरु मूळ मूळ भक्ता समर्था ... नृसिंहमुने ।।१।।

चिनी स्त्रीपुरुषा देह विसंगती, मृगयुग्मा रक्षी, समर्था ।। खद्योत द्विजा तेली अळवणी, सन्मार्गा लक्षी ।। तडाग नारायणी सिद्धासन, भुऱ्यास दे दर्शन, समर्था ।। दृष्टी सुरदासां, अंबेजोगाई कन्येचा नंदन, शिव विष्णू तीर्थे कोटी कूप, अधिक पवित्र केले समर्था ।। पंढरी भिमेवरती चालता जन थक्कची झाले।।
दत्तनगर मूळ पुरुष वटतरु, मूळ मूळ भक्ता, समर्था ... नृसिंहमुने ।।२।।
रामकृष्णमाता उठविली, चोळाप्पा शिष्य समर्था ।। कृष्णंभट धेनू पान्हे, जननीस्तव हो विठ्ठलदृश्य, कंटकशय्ये बघे बसाप्पा, रिक्त कुपी जलधार समर्था ।। चळअंबी रामदासी उज्ज्वल देव मामलेदार, कैवल्य श्रीयोगा संगम गवे स्वामी मोहळा, समर्था, चिंतोपंता दाजीबास्तव, मौनीबुवास लळा ।।
दत्तनगर मूळ पुरुष वटतरु, मूळ मूळ भक्ता, समर्था ... नृसिंहमुने ।।३।।
अर्ध लाडू प्रिय नीराबाईचा, सहजानंद तुम्ही, समर्था ।। राधा येसूला सोवळे शिकवीले करुणामंगल तुम्ही।। गाणगापुर उत्सव प्रज्ञापुरी, रिक्त चिलीम चेतली, समर्था ।। नागफणी कंटकी चालता गर्वहरित मंडळी, सव्वाशेर पेढे हयस्वारा, नवस सांगितला, समर्था ।। साह्य यज्ञि चिदंबरा, मुगटा गणपतीला दिधला ।।
दत्तनगर मूळ पुरुष वटतरु, मूळ मूळ भक्ता, समर्था ... नृसिंहमुने ।।४।।
ब्रह्माकारवृत्ती विष्णूला, राधा गर्व हरला, समर्था।। जाधव चिठ्ठी परतवी, तात्याराव पैज हरला, मुळ वदना बाळाप्पा माला, नृसिंहा रंडी सोड, सिद्धीची गृही दिप बाहेर धडपडे, कथा सिताराम गोड, स्मृती कस्तुरीची ठाकुरदासा, नष्ट श्वेतकुष्ठ, समर्था, ब्रह्मनिष्ठ वामना खडावा, देती करति श्रेष्ठ, शिवहर शंकर नमामि शंकर, शिवशंकर भक्ता समर्था... नृसिंहमुने ।।५।।
नाना रेखी नगरी सदनी, होती चतुर्थी, श्रावणीं ।। सखूताई मोदकात गर्क ब्राह्मण पाठार्थी ।। स्तंभ कडकडे झांपडच पडे, उजेड सर्वत्र, भिक्षा माई स्वामी नाथा वेषी करपात्र, जग कुंडलिनी जागृत करती, कुंडली करा हो, नाना कुंडली करा हो ।। विष्णूपद पादुका उमटती नाना करा हो,
दत्तनगर मूळ पुरुष वटतरु, मूळ मूळ भक्ता, समर्था ... नृसिंहमुने ।।६।।
पंचभौतिक तटबंदी मुक्ता, चिन्मय माया समर्था।। वृषस्कंधा शाल प्राशू महाभुज,

भव्योदर काया, राज्य सौंदर्य विद्या श्रीपाद, आत्मतेज भारता, समर्था।। त्रितापहरी मूर्ती मनोहरी, मनोरथ स्मरता।। अनंतकोटी ब्रह्मांडनायका राजाधिराज समर्था।। जयजय स्वामी समर्था।। वरही वराया समज द्या तुम्ही भरा माप रित्का।। षड्रिपु गोट्या श्रींच्या झेला, कविदासा पुनिता, समर्था।। दत्तनगर मूळ पुरुष वटतरु, मूळ मूळ भक्ता, समर्था ... नृसिंहमुने, चातकमुखी द्या कृपामेघ तीर्था ।।७।।

---

## ।। सच्चिदानंद श्री नानाजी रेखी यांची आरती ।।

(श्रीसत्यदेवानंद सरस्वती विरचित/चाल : आरती ज्ञानराजा प्रमाणे)

आरती ओवाळितो रेखीवंश प्रदीपा
सच्चिदानंद स्वामी महाराजा यतिरुपा।। आरती ओवाळितो।।धृ।।
जाहली अक्कलकोटी। स्वामी समर्थ भेटी।
स्वामीसुत संगतीत होय स्वामीकृपा मोठी।। आरती ओवाळितो।।१।।
पत्रिका सिद्ध केली। स्वामी मनासी आली।
हातावरी टाळी देतां। शक्तिपात दीक्षा झाली।। आरती ओवाळितो।।२।।
नानाजींचे तळहाती। विष्णुंपद उमटले।
स-विकार अज्ञानाचे। पाश क्षणात तुटले।।३।।
आरती ओवाळितो रेखीवंश प्रदीपा
सच्चिदानंद स्वामी महाराज यतिरूपा।। आरती ओवाळितो।।धृ।।
पूर्वाश्रमी नाना रेखी। त्यांची सती सखुबाई।
सेवेमाजी सदा दंग। 'नगरात' निज गेही।।४।।
बाळ वेषे नाथ पंथी। स्वामी स्तंभी प्रकटती।
''मीच हो अक्कलकोटी''। खूण सखूस देती।। आरती ओवाळितो।।५।।
नाना रेखी घेती अंती। शीघ्र सन्यासदीक्षा।
सत्यदेव सरस्वती। करी कृपा-प्रतीक्षा।।६।।
आरती ओवाळितो रेखीवंश प्रदीपा
सच्चिदानंद स्वामी महाराज यतिरूपा।। आरती ओवाळितो।।धृ।।

## ।। सद्गुरु श्री कृष्णाजी रेखी यांची आरती ।।

कवि अमरेंद्र (नितीन कुलकर्णी) कोल्हापूर, विरचित

आरती सद्गुरूंची, श्रीगुरूंची, आळवितो मी भावे आरती
सद्गुरूंची।।धृ।।
नाना रेखींच्या, थोर कुळी, अवतरली गुरुमुर्ती, पाहुनि बाळमुखा,
जन म्हणती, फिरून जन्मा आला आला कृष्णसखा।।१।। आरती ...
राहुनि संसारी, कधीकाली, संसारी नच रमले मन या योग्याचे
प्रभूपाशी, बली समर्पित केले साऱ्या भोगांचे।।२।। आरती ...
झाला दृष्टांत, वृश्चिक तो, स्वरुपानंदे स्वप्नी माथी ठेवियला
अन् डंखे अध्यात्माचा सोऽहं सोऽहं जागविला।।३।। आरती ...
सत्यदेवानंद सरस्वतींनी, दिक्षेचे अधिकार देउनिया स्वामी
आनंदे, विलीन झाले ब्रह्मी, गेले निजधामी।।४।। आरती ...
परंपरासुत्रे, सद्गुरूंनी, सोपविली संबोधून ''कृष्ण महाराज''
कविमन हे आनंदाने डोले जैसा गजराज।।५।। आरती ...
गुरुपौर्णिमेच्या पुण्यदिनी अर्पियली गुरूपायी आरती सद्गुरूंची
जळ मिळते जसे सागराठायी आरती सद्गुरूंची।।६।।
आरती सद्गुरूंची, श्रीगुरूंची, आळवितो मी भावे आरती सद्गुरूंची।।

---

## ।। कर्पूरारती ।।

कर्पूरगौरं करुणावतारं, संसारसारं भुजगेंद्रहारं, सदावसंत हृदयारविंद
भवंभवानी सहितं नमामि।।

---

## ।। मंत्रपुष्पांजली ।।

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्। ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः। ॐ राजाधिराजाय प्रसह्य साहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे। समेकामान् कामकामाय मह्यम् कामेश्वरो

वैश्रवणो ददातुः।। कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः। ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात् सार्वभौम सार्वायुष आंतादापरार्धात्।। पृथिव्यै समुद्रपर्यन्ताया एकराळिति तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरूतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे।। अविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति।।

---

**प्रदक्षिणा :** श्रीटेंबेस्वामी विरचित

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची, माझ्या स्वामीरायाची, झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची।।धृ.।। पदोपदी झाल्या अपार पुण्याच्या राशी, सर्वही तीर्थे घडली आम्हां आदिकरुनि काशी।।१।। मृदुंग टाळ घोळ भक्त भावार्थे गाती, नाम संकीर्तनी ब्रह्मानंदे नाचती।।२।। कोटी ब्रह्महत्या हरती करिता दंडवत, लोटांगण घालीता मोक्ष लाभे हो पायात।।३।। गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा निगमासी, अनुभवती ते जाणती जे सद्गुरुपदिचे अभिलाषी ।।४।। प्रदक्षिणा करुनी देहभाव हरविला, श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहीला ।।५।। श्रीपाद श्रीवल्लभ, श्रीनृसिंह सरस्वती, प्रदक्षिणेने षोडश अवताराची फलश्रुती ।।६।। श्रीदत्तांशी परमेष्ठी जगजेठी अक्कलकोटी, स्वामीसुता लागो आमुचे प्रणाम कोटी कोटी।।७।।

---

**श्रीस्वामींचरणी विज्ञापना :** श्रीस्वामीसुत विरचित

स्वामीराया माझी विज्ञापना सहजीं । करी चरणरजीं मान्य तूं बा ।।१।।
अज्ञान मी वेडें फिरलो चहूंकडे । दुःख तें रोकडें झाले देहीं ।।२।।
तुझें ब्रीद राया पतित ताराया । बाळकासी पायाजवळी ठेवी ।।३।।
तूंचि स्वामीराजा मायबाप माझा । गणगोत दुजा कोणी नसे ।।४।।
तुझ्या पायाविणें काहींच मी नेणें । आतां मज देणें देई तेंचि ।।५।।
त्रैगुण अवतार तूंचि सर्वेश्वरा । रक्षावें पामरा दयानिधे ।।६।।
जोडोनियां कर शीर पायांवर । ठेविलें निर्धार करोनियां ।।७।।

आहे मतिहीन नेणें भक्तिज्ञान । तुझेचि चरण ध्यात असे ।।८।।
उपासना कर्म नेणें कांही वर्म । आणिक तो धर्म जगदीशा ।।९।।
माझा सांभाळीता तूंचि हो अनंता । लेकराची चिंता असो द्यावी ।।१०।।
पतित मी खरा चांडाळ हा बरा । परी चरणीं थारा देई मज ।।११।।
तारिलें पतित पशुपक्षी सत्य । अजगरा यथार्थ उद्धरिलें ।।१२।।
स्वामीसुत म्हणे ऐसे तुझें देणें । बाळासी तारणें तुझें हातीं ।।१३।।

---

**श्री स्वामी समर्थांची दृष्ट :** श्री. जनार्दन विठ्ठल जोशी विरचित

कैसी दृष्ट रे बा तुजला हा तो माझा भ्रम। जेथे वाचाही मौनावे काय दृष्टीचा धर्म।। पै तू धरियेला अवतार माया मानुष कर्म। राहो आकारा भक्तांच्या भक्तीचे हे वर्म।।१।। माझ्या मानसी रंगला स्वामीनामे आला। जीवा उद्धरी एकसरा माया ब्रह्म-पसारा।। क्षणात आवरी तव फेरी ब्रह्मांडामाझारी। एक्या ठायी हो बैसोनि विश्वासी गवसणी।।२।। घालून थांबला, थांबला दशांगुळे तू उरला। दृष्टी उघडली उघडली, दृष्टही संपली।। मी-तू पणाचे नच काम, स्वामी मंगलधाम। कैसी दृष्ट रे बा तुजला हा तो माझा भ्रम।।३।।

---

**श्री स्वामी समर्थांचा जोगवा :** श्री. जनार्दन विठ्ठल जोशी विरचित

आदेश ओंकाराचा हा देश परतत्वाचा, हा वेष नवनाथाचा,
ब्रह्माचा जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।धृ.।।
अन्नपूर्णे आदिमाये मजसी जोगवा देई, ज्ञान वैराग्या सोई
देई सत्वाचा जोगवा, अंबे जोगवा, जोगवा।।१।।
तेथोन नाना देश, साधुसंतांचा प्रदेश, भावभक्तीचा लवलेश
हाची मागे मी जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।२।।
हे तो प्रचंड कलियुग येथे नाही भक्तिरंग, नाही भावाचा सुरंग
मिळणे कठीण हो जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।३।।

असल्या ओसाडही रानी, काही भक्त शिरोमणी, तेथे धावुनिया झणी
घेतो भावाचा जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।४।।
सच्छिल दरिद्री ब्राह्मण, तेथे गेलो मी धावून, वंध्या महिषी दुभवून
मी घेतला जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।५।।
आलो ऐसाची हिंडत, मुंबई प्रांती नगरात, 'माई, भिक्षा भिक्षा' म्हणत
सखुने वाढला जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।६।।
बाल भक्तासी जोगवा, नेऊनी ओंकाराच्या गावा, सद्गुरु चरणांचा ठावा,
आत्मानंदाचा जोगवा, अंबे जोगवा जोगवा।।७।।

---

## श्री स्वामी समर्थांसाठी विडा : श्रीटेंबेस्वामी विरचित

विडा घ्या हो स्वामीराया धरुनी मानवाची काया, यती वेष घेऊनीया,
वसता दिनासी ताराया, विडा घ्या हो स्वामीराया।।१।।
विज्ञान हे पुंगी फल, भक्ती नागवल्ली दळ, वैराग्य चूर्ण विमळ,
लवंगा सक्रिया सकळ, विडा घ्या हो स्वामीराया।।२।।
प्रेम रंगवी जैसा कात, विडा अष्टभावासहित, जायफळ क्रोध रहित,
पत्री सर्व भूत हित, विडा घ्या हो स्वामीराया।।३।।
खोबरे हेची क्षमा, फोडूनी द्वैताच्या बदामा, मनोजय वर्ख हेमा,
कापूर ही शांती नामा, विडा घ्या हो स्वामीराया।।४।।
कस्तुरी ही निरहंकार, कोठे ना मिळती उपचार, भिमापुत्रा यास्तव फार,
सत्वर देऊनी वारंवार, विडा घ्या हो स्वामीराया।।५।।

---

## श्री स्वामी समर्थांसाठी हुक्का : श्रीसत्यदेवानंद सरस्वती विरचित

माझा हुक्का मीच घेतो तुवा काय द्यावा, भक्ता तुवा काय द्यावा,।।ध्रु.।।
वासनेच्या रानी-तुवा जन्म घालवावा, ज्ञानाच्या अंगाऱ्यावर तंबाखू साकार, घालूनी तंबाखू साकार, एकची हुक्का घेता होशिल निर्गुण निराकार, माझा हुक्का मीच घेतो तुवा काय द्यावा।।१।।

ज्ञानशक्तीच्या ठिणगीवरती मायेचा चंडोल, ठेवोनी मायेचा चंडोल, एकची घुटका घेता लागे आत्मानंदी डौल, माझा हुक्का मीच घेतो तुवा काय द्यावा ।।२।। इंद्रियसंगे विषयांच्या तू दारोदार धावा, घ्यावा दारोदारा धावा, त्यांच्या उष्ट्या चिलमी ओढूनी जन्म घालवावा, माझा हुक्का मीच घेतो तुवा काय द्यावा ।।३।।

---

**श्रीगुरूदत्ताष्टक :** स्वामी श्रीवासुदेवानंद सरस्वती विरचित

इंदुकोटितेजकीर्णसिंधु भक्तवत्सलं। नंदनत्रिसूनुदत्तामिंदिराक्षश्रीगुरुं ।। गंधमाल्य-अक्षतादिवृंद-देववंदितं। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम् ।।१।। मोहपाशअंधकारजातदूर भास्करं। आयताक्ष पाहि श्रियवल्लभेशनायकम्।। सेव्यभक्त-वृंदवरद भूयोभूयो नमाम्यहम्। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम् ।।२।। व्योमवायुतेजआप-भूमिकर्तृमीश्वरान्। कामक्रोधमोहरहितसोमसूर्यलोचनम् ।। कामितार्थदातृभक्तकामधेनु-श्रीगुरुम्। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम् ।।३।। पुंडलीककायताक्षकुंडलेंदुतेजसम्। चंडदुरिखंडनार्थदंडधारिश्रीगुरुम्।। मंडलीकमौलि-मार्तंडभासिताननं वरम्। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम् ।।४।। वेदशास्त्रस्तुत्य-पादमादिमूर्तिश्रीगुरुम्। नादबिंदुक्रलातीत-कल्पपादसे व्ययम्। सेव्यभक्तवृंदवरद भूयोभूयो नमाम्यहम्। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम्।।५।। अष्टयोगतत्त्वनिष्ठ तुष्टज्ञानवारिधिम्। कृष्णवेणितीरवासपंचनदीसंगमम्। कष्टदैन्यदूरभक्ततुष्टकाम्यदायकम्। वंदयामि नारसिंहसरस्वतीश पाहि माम्।।६।। नारसिंहसरस्वतीश नाममष्ट-मौक्तिकम्। हारकृत्य शारदेनं गंगाधराख्य आत्मजं। धारणीकदेवदीक्षगुरुमूर्तितोषितम्। परमात्मानंदश्रिय पुत्रपौत्रदायकम्।।७।। नारसिंहसरस्वतीश अष्टकं च यः पठेत्। अघोरसंसारसिंधुतारणाख्यसाधनम्। सारज्ञानदीर्घआयुरारोग्यादिसंपदाम्। चारुवर्गकाम्यलाभनित्यमेव यः पठेत्।।८।।

---

**श्रीदत्तस्तोत्रम् :** स्वामी श्रीवासुदेवानंद सरस्वती विरचित

श्रीगणेशायनमः।। आदौ ब्रह्म त्वमेकमेव जगतां, वेदात्ममूर्तिर्विभो। पश्चात्क्षोणितले

विनाशिदितिजे कृत्वावतारं प्रभो।। हत्वां दैत्यमनेक-धर्मरचिता भूत्वात्मजोऽत्रेर्गृहे। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।१।। भूदेवाखिलमानुषं विदुजना बाधायमानःकलिम्। वेदादुष्य-मनेकवर्णमनुजाभेदादिभूतोन्नतिम्।। छेत्ताऽधर्मतमांधकारहरणं ज्ञानप्रदीप्तोज्ज्वलम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।२।। ध्यातस्त्वं हरिमनेकयाति गुरवो, जाताग्रजन्मा विभो। हेतुः सर्वविभो जनाघहरणं ज्योतिःस्वरुपं जगत्।। चातुर्थाश्रमस्थापितं क्षितितले पातुः सदा सेव्ययम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।३।। चरितं चित्रमनंत-कीर्तिमतुलं परिभूतभूमंडले। मूकं वाक्यामिवांधकस्य नयनं, वंध्या च पुत्रं ददत्।। सौभाग्यं विधवा च दायकश्रियं, दत्वा च भक्तं जनम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।४।। दुरिताघोरदरिद्रदावतिमिरहरणं जगज्ज्योतिषम्। सुरधेनुमुरपादपारतजना, करुणादिभक्तार्तिहा।। नरसिंहसरस्वतीश्वर विभो शरणागतं रक्षणम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।५।। गुरुमूर्तिचरणारविंदयुगलस्मरणे कृते। नित्यं सौचरितं क्षेत्रमनेक-तीर्थसफलं सरिदादि भागीरथी।। तुरगादि मेघसहस्त्रगो विदुर्जनाः सम्यक् ददंस्तत्फलम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपाद-युग्मांबुजम्।।६।। नो शक्यं तव नाममंगलस्तवं वेदागमागोचरम्। पादद्वंदहृदयज्वरातरजलं निधाय त्वीष प्राकृतम्। भूयो भूयः स्मरन्नमामि मनसा श्रीसद्गुरुं पाही माम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।७।। भक्तानां तरणाय सर्वजगतां दीक्षां दद्योगिनाम्। सुक्षेत्रं सुरगाणगस्थित प्रभो दत्वा चतुष्कामदा।। स्तुत्वा भक्तिसरस्वती गुरुपदं जित्वाद्य घोषादिकम्। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।८।। एवं श्रीगुरुनाथमष्टकमिदं स्तोत्रं पठेन्नित्यशः। तेजोवर्चबलोन्न-तिश्रियकर्मानंदवर्ध वपुः।। पुत्रापत्य-मनेकसंपदलभं दीर्घायुरारोग्यतां। वंदेऽहं नरकेसरी-सरस्वती-श्रीपादयुग्मांबुजम्।।९।। शातं पद्मासनस्थं शशिधरमुकुटं पंचवक्त्रंत्रिनेत्रम्। शूलं वज्रं च खड्गं परशुमभयदं दक्षिणाङ्गंवहंतम्। नागं पाशं च घंटां वरडमरुयुतं चाङ्कुशं वामभागे। नानालंकारयुक्तं स्फटिक-मणिनिभं पार्वतीशं नमामि।।१०।।

## **शेजारती 'निद्रा'** : श्रीनिरंजन रघुनाथ विरचित

**आता स्वामी सुखे निद्रा करा अवधुता, नृसिंह सरस्वती अवधुता**
**चिन्मय सुखधामा जाऊनी पहुडा एकांता ।।धृ ।।**
**वैराग्याचा कुंचा घेऊनी चौक झाडीला, स्वामी हा चौक झाडीला**
**तयावरी सुप्रेमाचा शिडकावा दिधला, आता स्वामी ।।१।।**
**पायघड्या घातल्या सुंदर, नवविधा भक्ती, स्वामी नवविधा भक्ती**
**ज्ञानाच्या समया उजळुनी लावियेल्या ज्योती, आता स्वामी ।।२।।**
**आशातृष्णा कल्पनांचा सांडुनि गलबला, स्वामी सांडुनी गलबला,**
**क्षमा, दया, शांती दासी उभ्या सेवेला, आता स्वामी ।।३।।**
**द्वैताचे कपाट लावुनी एकत्र केले, स्वामी एकत्र केले**
**दुर्बुद्धिच्या गांठी सोडुनि पडदे सोडीले, आता स्वामी ।।४।।**
**भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगीला, हृदयाकाशी टांगीला**
**मनाची सुमने जोडुनि केले शेजेला, आता स्वामी ।।५।।**
**अलक्ष उन्मनि घेऊनी नाजुक दुशेला, स्वामी नाजुक दुशेला**
**निरंजनी सद्गुरु माझा निजे शेजेला ।।धृ ।।**

---

## **शेजारती 'निद्रा'** : श्रीसत्यदेवानंद सरस्वती विरचित

**उशीर झाला सद्गुरुराया, स्वामी समर्था, प्रभो स्वामी समर्था।।**
**आता निद्रा करा विनवितो पदी ठेवूनी माथा ।।धृ ।।**
**नरहरि सोनारे हा घडविला मंचक सुंदर। सुवर्ण मंचक सुंदर।।**
**निर्मळ केले पहा जनीने अवघे शेजघर।**
**सावत्यानें सुमने आणिली अनेक रंगाची। देवा बहुविध गंधांची।।**
**ज्ञानदेवे कोमल शय्या रचली हो त्यांची ।।१।। उशीर झाला सद्गुरुराया.**
**एका जनार्दनी पडदे सोडियले, मंदिरी भावे पडदे सोडियले।**
**हुक्का प्यावे रामदासे हात जोडियले।**
**चौरी घेऊनी करी तुकोबा म्हणती झोपावे। प्रार्थियले कधी न कोपावे।।**

सत्यदेवानंदा आता पाय चुराया द्यावे ।।२।। उशीर झाला सद्गुरुराया.

**श्रीदत्तात्रेय अष्टक :** स्वामी श्रीवासुदेवानंद सरस्वती विरचित

मातेचे उदरांत मास नव हे तद् राहतां अग्नीने। उष्मा होऊनि जंतू दोषही जया स्थानांत दुर्गंधीने।। मातेच्या विविधान्न भक्षणरसे केले बहु घाबरें। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले अतां पाव रे।।१।। येता बाहेर सौख्य दुःख न कळे बोलावया येईनो। देती औषध जे जयासि रुचले ते नेणती भावना।। किरकिर करी म्हणुनि मारिति करे येवोनियां का बरे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।२।। किंचित ज्ञान आले तधी मज बहु खेळावयाची सवें। खोड्याही करणे परासि पिडणे हे आवडे आठवे।। होती लोक समस्त तात-जननी कोपे असे का बरे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे ।।३।। आले यौवन तो मदांध झालो विद्या धनाच्या बळे। योषित लंपट होऊनी पितृ-गुरु-ज्ञातेही धिक्कारले।। होय स्त्री अवलोकितांची मदने मत् चित्त हे बावरे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।४।। रोगे ग्रासियलें उपाय न चले औषधाने कधी। प्रातःस्नान ब्रह्मकर्म न घडे, शक्ति नसे विग्रहीं।। चिंता शोक भरे निरंतर मुखी ये ना तुझे नांव रे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।५।। वृद्धत्वे पुत्रकन्या दिलेस गुरुवरा वांझ नारीस देवा। वंध्या महिषि दुभवुनि देऊनियां द्रव्य ठेवा।। छेदुनि घेवडा वेल विप्र बहु संतोषविला बरें। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।६।। करुणाघन म्हणुनि वानिति तुला वेदांत शास्त्रज्ञही। भक्ताभीष्ठ सदाहि करसी दुष्टांतका प्रत्यहीं।। भृत्या किंचित दुःख पाहुनि त्वरे घेसी सख्या धाव रे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।७।। ही भीमात्मज तनयासी संसृति भवें दुःखे बहु ग्रासिलें। हे दवडा अथवा मनीं जरि असे हे पाहिजे भोगिलें।। भोगाया मनी धैर्य देऊनि पदी देई तुझ्या ठाव रे। दत्तात्रय अपार दुःख मजला झाले आतां पाव रे।।८।।

**स्वामी माझा बोल :** श्रीआनंदनाथ स्वामी विरचित

स्वामी माझा बोल, स्वामी भांडवल।। व्यापारासी मोल नाही माझ्या।।
सदा तोची नफा झाला हो फायदा।। नुकसान ते कदा नाही नाही।।
नामाची तिजोरी प्रेमाची रोकड।। देह खरडा खोड सोडियली।।
काम, क्रोध, लोभ घालोनिया खर्ची।। अहंकाराची स्थिती ओपीयली।।
आनंद म्हणे आम्ही केला बाजार।। भरतो बाजार स्वामी नामी।।

---

## ।। श्रीविष्णू मंत्र ।।

(अथ ध्यानम्) ॐ शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं। विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम्। लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं। वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम्

(इति ध्यानम्) ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे। त्या त्या स्थळी हे निजरुप तुझे। मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी। तेथे तुझे सद्गुरु पाय दोन्ही।

---

## ।। त्रिवारवंदन ।।

ॐ रक्तांग रक्तवर्ण पद्मनेत्र सुहास्यवदन कंथा टोपी च मालादण्ड कमण्डलू धर कट्यांकर रक्षक त्रैगुण्यरहित त्रैलोक्यपालक विश्वनायक भक्तवत्सल कलियुगे श्रीस्वामीसमर्थावतार धारक त्राहिमाम्। त्राहिमाम्। त्राहिमाम्।

---

**तिर्थ :** श्रीस्वामीसूत विरचित

स्वामी आता कृपा करा, तिर्थ देऊनी उद्धरा।।
तिर्थ-प्रसाद चरणांचा लाभो मज साचा।।
भक्तातुरे चित्ती तिर्थ-प्रसादे उद्धरा।।
पायघड्या या सुंदर चरणी शोभे मनोहर।।
चालता शोभती समर्थ, पुरविती हेची मनोरथ।।
बैसले स्वामी सिंहासनी, शोभा अनंत द्विगुणी।।



बाप्पा लळा पुरविला, दिधले तिर्थ-प्रसादाला।।
देवा-दानवा दुर्लभ त्याचा झाला मला लाभ।।
टाळी वाजवा गजर करा, श्रीस्वामीनामे नित्य स्मरा।।
आनंद करा स्वामीपायी, स्वामीनामी करा घाई।।
स्वामीसूत आनंदला, घेऊनी तिर्थ-प्रसादाला।।१ ।।

गुरु परमगुरु, परमेष्ठी गुरु, परात्पर गुरु।। पादोदकं तिर्थम् जठरे धारयाम्यहम् ।।२।। महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती, त्रिपूरसुंदरी, बाला पंचमहादशी, अष्टमहासिद्धी, अष्टविनायक, नवदुर्गाम् पादोदकं तिर्थम् जठरे धारयाम्यहम् ।।३।।

## ।। श्री स्वामी समर्थ (रेखी) मठ, नगर येथील दैनंदिन उपासना

**⁕ श्रीस्वामीसमर्थांची नित्य पूजा आणि सकाळची आरती ⁕ रात्रीची आरती (रात्रौ. ८ ते ८.३०** आणि **गुरुवारी रात्रौ. ८ ते ९ : आरती व शेजारती)**

## ।। श्री स्वामी समर्थ (रेखी) मठ, नगर येथील वार्षिक उत्सव ।।

### ।। श्री स्वामी समर्थ महाराज जयंती उत्सव (प्रकट दिन) : चैत्र शुक्ल २।।

श्रीस्वामीसमर्थांचा जन्मोत्सव (प्रकटदिन) सूर्योदयानंतर दिड घटिकांनी (अडीच घटिका : एक तास) सुमारे ३६ ते ४० मिनिटांनी साजरा केला जातो. दुपारी चांदीच्या पादुकांची पाद्यपुजा केली जाते. इतर दिवशी गाभाऱ्यात असलेल्या या चांदीच्या पादुका फक्त श्रीस्वामी जन्मोत्सवासाठी बाहेर काढतात. या निमित्ताने पाच दिवस किर्तन करण्यात येते.

### ।। श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी उत्सव : चैत्र वद्य१३।।

श्रीस्वामींच्या मूर्तीवर आणि पादुकांवर अभिषेक, नैवेद्य आणि पुढे दुपारी १२ ते १२.३० या वेळेत आरती होते. आरतीनंतर नगर येथील गायत्री मंदिर व ज्ञानेश्वर हॉल येथे भंडारा असतो. दुपारी १२ ते ४ या वेळेत भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले जाते.

### ।। श्रीगुरुपौर्णिमा उत्सव : आषाढ शुक्ल १५।।

गुरुपौर्णिमेला गोदावरी नदीचे पाणी आणून त्या पाण्याने श्रीस्वामीसमर्थांच्या मूर्तीला स्नान घालण्यात येते. त्यानंतर मूर्तीवर दुधाचा अभिषेक केला जातो व पुन्हा कोमट पाण्याने आंघोळ घालण्यात येते. या निमित्ताने बाहेरून आलेल्या भक्तांना प्रसादभोजन दिले जाते. दुपारी ३ ते ३.३० शांतीपाठ व सायंकाळी पाच वाजेपर्यंत सोऽहम साधना करण्यात येते. श्री. कृष्णाजी रेखी यांचा शिष्यवर्ग आणि मठातील अन्य भक्त सामुहिक साधना करतात.

### ।। नवरात्रोत्सव : आश्विन शुक्ल १ ते आश्विन शुक्ल १०।।

नऊ दिवस चालणाऱ्या श्रीदेवी उत्सवात श्रीस्वामीसमर्थांना मंगळवारी व शुक्रवारी श्रीदेवीची विविध वस्त्रे (साडी) व अलंकार घालून **'भगवती आदिमाया'** स्वरुपात सजवले जाते.

### ।। श्रीदत्तजयंती उत्सव : मार्गशीर्ष शुक्ल १५।।

श्रीस्वामीसमर्थांच्या मूर्तीला सकाळी अभिषेक करण्यात येतो. सायंकाळी कीर्तन (४.४५ ते ७.०० वाजेपर्यंत) होते आणि कीर्तन चालू असताना श्रीदत्तजन्म व त्यानंतर पाळणा तसेच आरती व प्रसाद हे कार्यक्रम संपन्न होतात.